**सं.फौ.फौ.क्र. ५२३/२०२४**
**सरकार –वि– मंगलाबाई जाधव**
**निशाणी क्र. १३**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची शपथेवर जबानी.**

नांव – लक्ष्मण संपत जाधव

वय – ३८

धंदा – मजूरी

राहणार – वडनेर भैरव, ता. चांदवड जि. नाशिक

**<u>सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता</u>**

१. दि.१७.११.२०२३ रोजी मी वडनेर भैरव येथे घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यासाठी गेलो नव्हतो. पोलिसांनी घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यासाठी बोलावल्यावरुन मी गेलो होतो किंवा कसे ते मला आठवत नाही. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकूरा विषयी मला काही माहित नाही. त्यावर माझी आहे. सहीला **निशाणी १४** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**साक्षीदार सरकारी पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी उलटतपासणीच्या स्वरुपातील सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. ती त्यांना देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की पोलीस हवालदार सौदागर यांनी मला बोलावून सांगितले की, आरोपी मराठी शाळेच्या पाठीमागे वडारवाडी, वडनेर भैरव येथे गावठी हातभट्टीची दारु तयार करुन विक्री करत आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळावर छापा टाकून पंचनामा करण्यासाठी मी पोलीसांना संमती दिली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यानुसार मी व दुसरा पंच पोलीसांसोबत घटनास्थळी गेलो असता तिथे आरोपी घराच्या पाठीमागे संशयितरित्या स्टीलचा डबा घेऊन बसलेली दिसली. हे म्हणणे खरे नाही की आम्हाला मिळालेल्या बातमीची खात्री पटल्यावर आम्ही छापा टाकला असता तिला पोलिसांची चाहुल

लागल्यावर ती डबा तेथेच टाकून पळून गेली. **हे म्हणणे खरे नाही की,** घटनास्थळावर आजूबाजूला तपासणी केली असता, गावठी हातभट्टीची दारु तयार करण्याचे रसायन, तीन प्लॅस्टीकचे निळे ड्रम, एक निळी रंगाची प्लॅस्टीकची जमिनीत पुरलेली टाकी, हातभट्टीची दारु तयार करण्यासाठी वापरण्यात येणारा चाटू, शेगडी आणि साहित्य मिळून आले.

३. हे म्हणणे खरे नाही की, आजूबाजूच्या उपस्थित लोकांकडे आरोपीचे नाव विचारले असता त्यांनी तिचे नाव मंगलबाई जाधव असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, १० लिटर मापाच्या स्टीलच्या डब्यामध्ये ८ लिटर तयार गावठी दारु, २ निळे २०० लिटर मापाचे दोन प्लॅस्टीकचे ड्रम त्याच्यामध्ये ४०० लिटर दारु, १०० लिटर मापाच्या ड्रममध्ये १०० लिटर हातभट्टीची दारु तयार करण्याचे रसायन, हातभट्टीची दारु तयार करण्यासाठी लागणारा चाटू असा एकूण ५०,४००/- रुपये किंमतीचा माल घटनास्थळावरुन जप्त केला व त्यापैकी १८० मिलीच्या दोन वेगवेगळ्या बाटल्यांमध्ये तयार दारु व रसायन सॅम्पलसाठी काढून घेतले व त्यावर पंचांच्या व पोलिसांच्या सह्यांची लेबले लावली. हे म्हणणे खरे नाही की, त्यानुसार पोलिसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला. त्यावर मी वाचून सही केली.

४. माझे शिक्षण इयत्ता ५ वी पर्यंत झालेले आहे. मला लिहिता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचवण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. पी. पी. पवार यांनी नाकारला.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.04.15 16:13:12 +0530

**दि. १५.०४.२०२६** **(वृषाली दी. सुंगारे)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**क.स्तर चांदवड.**